# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.

डॉ. शाकेरा इनामदार
एम्.एस्सी.,पीएच्.डी.
कार्यक्रम समन्वयक

दूरध्वनी (कार्यालय): ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
टेलीफॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१
मोबाईल : ९८२२ ७० ७० ६१

संदर्भ : रासेयो/ ७९० /१३

दि : २५ जुलै २०१३

प्रति
प्राचार्य /कार्यक्रम अधिकारी
पुणे शहर
रासेयो संलग्नित महाविद्यालये

विषय : रासेयो स्वयंसिद्धा अभियान अंतर्गत स्वसंरक्षण प्रशिक्षण देणेबाबत...

महोदय,

पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना, पुणे, पुणे शहर पोलिस आयुक्तालय व स्वयंसिद्धा असोसिएशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थीनींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षण पूर्व निवड चाचणी शिबिराचे आयोजन दि २९ जुलै २०१३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभाग, पुणे विद्यापीठ याठिकाणी आयोजित करण्यात आले आहे. पुणे शहरातील रासेयो महाविद्यालयांतील प्रत्येकी ५ याप्रमाणे २०० विद्यार्थीनींना प्रशिक्षण देवून त्यांच्यामार्फत महाविद्यालयीन इतर विद्यार्थीनींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

त्यानुसार सदर निवड चाचणी शिबिरातून निवड झालेल्या विद्यार्थीनींकरीता ऑगस्ट २०१३ महिन्यामध्ये ७ दिवसीय मुख्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. या पूर्व निवड शिबिरामधून निवड झालेल्या विद्यार्थीनींना पुढील मुख्य प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभागी होणे अनिवार्य आहे याची कृपया नोंद घ्यावी. निवडचाचणी शिबिरातून निवड करण्यात आलेल्या विद्यार्थीनीना पुढील प्रशिक्षण कालावधीत योग्य मानधन देण्यात येणार आहे.

तरी कृपया आपण आपल्या महाविद्यालयातील ५ विद्यार्थीनी यांना सदर निवड चाचणी शिबिराकरीता दि २९ जुलै २०१३ रोजी सकाळी १०.०० वाजता रासेयो कार्यालयात पाठवावे ही विनंती. <u>(बायोडाटा व सोबत जोडलेली माहिती देण्यात यावी)</u>

कळावे,

आपली विश्वासू

कार्यक्रम समन्वयक
रासेयो, पुणे विद्यापीठ,पुणे

खालील बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | वय | – १८–२५ वर्षे |
| २. | उंची | – ५.५ फूट (१५२ से.मी. पेक्षा जास्त) |
| ३. | लिंग | – विद्यार्थिंनी व महिला प्राध्यापकांसाठी |
| ४. | आरोग्य | – शारिरीक दृष्ट्या सक्षम |
| ५. | स्वंयसिध्दा | – स्वयंसिध्दा कोर्स धारक – महाराष्ट्र शासन आयोजित |
| ६. | मार्शल आर्ट प्राविण्य | – ब्लॅक बेल्ट धारक – महाराष्ट्र शासन मान्य खेळात |
| ७. | मार्शल आर्ट खेळ प्राविण्य | – राज्यस्तर प्राविण्य, महाराष्ट्र शासन आयोजित |
| ८. | इतर खेळ प्राविण्य | – राष्ट्रीय खेळ पदक विजेती |
| ९. | प्रशिक्षण अनुभव | – कमीत कमी २ वर्षाचा स्वसंरक्षण प्रशिक्षण अनुभवी महिला |
| १०. | महिला पोलीस | – महिला पोलीस पात्र नियुक्ती झालेली असावी |

(टिप – १ ते ५ आवश्यक पात्रता बाबी, ६ ते १० कुठलाही एक ग्राह्य धरला जाईल.)